Degloor College, Degloor
Dist. Nanded

# Vidyawarta®

International Multilingual Research Journal

Issue-23, Vol-.04 January to March- 2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded




14) Identifying Entrepreneurial Talents of School Students By ......
Mrs. M. Aakina Barveen, Dr. I. Mohammed Shaw Alem || 68

15) USE OF CLOUD COMPUTING IN LIBRARY FIELDS
Dr. K. Choudhary, Dr. G.S. Patel, Dr. O.P. Patel || 71

16) THE CHANGING STATUS OF TRANSGENDER IN INDIA
Kanak Priya || 76

17) Kanshi Ram and his BAMCEF for Bahujans in India
Dr. Rajesh Chandra Ranjan || 83

18) Gandhi's Satyagraha and Swaraj
Om Prakash Sharma || 89

19) ई-शासन : संकल्पना आणि आव्हाने
प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव || 94

20) स्त्री सक्षमीकरणात बचत गट योजनेचे योगदान
प्रा. निलेश अ. फटींग || 97

21) तौलनिक साहित्य : तात्त्विक मीमांसा
प्रा. डॉ. प्रकाश ज्ञानोबा जाधव || 100

22) "प्राथमिक शिक्षकांची अध्यापन अभिवृत्ती आणि कार्यतत्परता यांच्यातील .......
प्रा. डॉ. सौ. देवानंदा पारस सांखला, सौ. जयश्री सुदाम बागले || 103

23) प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि चिंता .......
प्रा. डी. झेड. चौधरी || 105

24) प्राथमिक शाळांमधील शिक्षकांचा ताणतणाव आणि समायोजन क्षमता .......
प्राचार्य डॉ.सौ.लता सुभाष मोरे, जितेंद्रगीर विश्वासगीर गोसावी || 107

25) इयत्ता पाचवीच्या इंग्रजी विषयाच्या अध्यापनासाठी सर्जनशील अध्यापनाचा .....
प्राचार्य डॉ.सौ.लता सुभाष मोरे, वनमाला महारु पवार || 109

26) प्राचीन भारतातील शिक्षा पध्दति
प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव || 111


https://sites.google.com/site/vidyawartajournal http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
Jan. To March 2018
Issue-23, Vol-04


ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

अध्यापन

| अध्ययन गट | N | M | SD | तक्ता 't' मूल्य | प्राप्त 't' मूल्य | त्याग/स्विकार |
|---|---|---|---|---|---|---|
| सर्जनशील अध्यापन | ३० | १५.२१ | ३.१२ | २.०० | ३.२३ | त्याग |
| पारंपारिक पद्धती | ३० | १२.९१ | ४.२ | | | |

df = ५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य ३.२३ असुन ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील सर्जनशील अध्यापनाचा व पारंपारिक पद्धतीने अध्यापन केल्यास त्यांच्या शैक्षणिक संपादणुकीच्या मध्यमान गुणांकात सार्थ फरक आढळून येतो. सर्जनशील अध्यापन केलेल्या विद्यार्थी गटाचे मध्यमान १५.२१ हे पारंपारिक पद्धतीने अध्यापन केलेल्या गटाचे मध्यमानापेक्षा १२.९१ अधिक आहे. यावरून असे म्हणता येईल की, इयत्ता विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी पारंपारिक पद्धतीपेक्षा सर्जनशील अध्यापन जास्त परिणामकारक आहे.

निष्कर्ष -

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयातील अध्यापनासाठी पारंपारिक पद्धतीपेक्षा सर्जनशील अध्यापन जास्त परिणामकारक आहे.

संदर्भसूची

1. Best, J.W. and Khan, K.M. (2002). Research in Education. (7th Ed) New Delhi: Practice Hall of India.

2. Kothari, C.R. (1990). Research Methodology, Methods and Techniques. New Delhi: Wiley Eastern Limited.

३. कुंडले. म. बा. (१९९७). मराठीचे अध्यापन. पुणे: श्रीविद्या प्रकाशन.

४. पंडीत. बन्सीबिहारी (१९९७) शिक्षणातील संशोधन संकल्पनात्मक परिचय. पुणे: नुतन प्रकाशन.

□□□

26

# प्राचीन भारतातील शिक्षा पध्दति

प्रा. डॉ. लखटे रत्नाकर बाबुराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

१९९३ च्या मुंबई बॉम्ब स्फोट खटल्यातील मुख्य आरोपी अबु सालेम आणि डेरा सच्चाचे प्रमुख गुरमित राम रहिम बाबा या दोघांना अलिकडेच महाराष्ट्र व हरियाणातील न्यायालयाने केलेल्या गुन्हा अंतर्गत शिक्षा सुनावली. या दोघांनाही न्यायालयाने सुनावलेली शिक्षा ऐकुन माझ्या मनात प्राचीन भारतात शिक्षा पध्दती कशी असावी हे समजुन घेण्याची उत्सुकता निर्माण झाली. या उत्सुकतेतुनच या लेखाची निर्मिती झाली. गुन्हेगारासाठी दिली जाणारी वर्तमानातील शिक्षा प्राचीन भारतातील शिक्षा पध्दति समानच आहे का वेगळी आहे. परंतु येथे एक बाब लक्षात घ्यावी ती अशी की, वर्तमान गुन्ह्याचे स्वरूप बदलत आहे. परंतु मानसिकता गुन्हेगाराचीच आहे.

प्रस्तुत विषयावर लेखन करत असताना प्राचीन भारतातील समाजशास्त्र, नागरशास्त्र, धर्मशास्त्र आणि राज्यशास्त्र समजुन घ्यावे लागेल. त्यासाठी महाविद्यालय आणि देगलूर मधील सार्वजनिक वाचनालयातील संदर्भ ग्रंथालयाचा आधार घेतला. त्यासाठी ग्रंथालयीन व विश्लेषणात्मक अभ्यास पध्दतीचा आधार घेतला. प्राचीन काळातील अनेक धर्मग्रंथांनी कोणकोणत्या शिक्षा पध्दती सांगितल्या हे जाणून घेण्याच्या मुख्य हेतुने हा लेख प्रपंच केला. ज्यातुन वर्तमान न्यायालयीन यंत्रणा व तिच्या शिक्षेच्या स्वरूपावर त्याचा काही प्रभाव पडला का हे तपासता येईल.

प्राचीन भारतीय शिक्षा पध्दती समजुन घेण्यासाठी प्राचीन समाज जीवनावर विचार करावा लागेल. तो करताना हे लक्षात येते की, धर्म प्राचीन भारतीय समाज जीवनाच्या चिंतनाचा व कर्माचा केंद्रबिंदू होता. प्राचीन भारताचा अभ्यास ज्या स्त्रोतांच्या सहाय्याने केला जातो त्या सर्वांत धर्माच्या प्रभावांचे स्पष्ट केले. स्मृति, उपनिषद, महाकाव्य, धर्मशास्त्र, नितीशास्त्र या सर्वांत धर्म, धर्माचे राज्य व धर्माधिष्ठित समाजाच्या अस्तित्वाला प्रधान्याने चित्रित केले. प्राचीन काळात राज्य, सत्ता, धर्मावर आधारित असल्याचे उल्लेख अनेक



Scanned by CamScanner

ADARSH EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded



ग्रंथात आढळतात. कारण धर्मच राज्याच्या उद्याचे व अस्तित्वाचे मुळ प्रयोजन होते. तसेच राज्याची रचना, उदय व विकास धर्मांच्या सुरक्षिततेसाठीच करण्यात आली. प्राचीन भारतीय धर्म ग्रंथातून अभिव्यक्त होणारे धर्माचे वास्तव स्वरुप आणि राज्य व्यवस्थेशी त्याचे असणारे संबंध अभिव्यक्त होतात. यावरुन हे स्पष्ट होते की, प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानातुन अभिव्यक्त होणारा धर्म, शब्द आणि त्याला पर्याय म्हणून वर्तमानात इंग्रजीतून वापरत जाणारा रिलीजन शब्द हा कोणत्याही अर्थाने योग्य नाही. कारण प्राचीन भारतीय ग्रंथानी धर्माच्या विशाल परिप्रेक्ष्यात उपासना, श्रध्दा यापुरते मर्यादित न ठेवता नैतिक नियम, व्यवस्थेचे मुलभुत आधार, सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेचे आधारभुत नियम, व्यक्तिगत आणि सामाजिक वर्तनाचे नैतिक नियम, परंपरा आणि राज्य उदयाची पध्दती पर्यंत समाविष्ट केले.

राज्यसंस्थेचा उदय होण्या अगोदरच्या अवस्थेला सर्व भारतीय ग्रंथांनी मत्स्य न्याय या अर्थाने संबोधले. ज्यास सामाजिक कराराच्या समर्थकांनी नैसर्गिक अवस्था व मार्क्सने आदिम साम्यवादी अवस्था संबोधले. तर महाभारत राज्यापूर्वीच्या अवस्थेला दोन प्रकारांत चित्रित केले. त्यात प्रारंभी व्यक्ती सद्भावनेने पारस्परिक व्यवहार करत. त्यामुळे जीवन सुव्यवस्थित आणि सुखपूर्ण होते. मानवी वर्तन धर्मानुसार होते. धर्म मानवी वर्तनाला नियंत्रित करत.

महाभारत धर्माचे सामाजिक महत्त्व सांगितले. ज्यात धर्म व्यक्तिला दुसऱ्याच्या कार्यात हस्तक्षेप करण्याची मान्यता देत नाही. तसेच दुसऱ्याच्या कर्तव्यपुर्तीत मदतनीस होण्याची भुमिका बजवावी हे ही धर्मच सांगतो. धर्मांचा लोप झाल्यानेच मस्त्य न्याय निर्माण झाला. अराजकता व अस्थिरतेचा उदय झाला. राज्य उदयास येण्यापूर्वी आणि धर्मांचे वर्चस्व नष्ट झाल्या नंतरचा मधला काळ मानवी समुहासाठी वाईट होता.

भारतात प्राचीन काळात मानवी वर्तनाला नियंत्रित करण्यासाठी धर्मानुसार काही नियम बनवण्यात आले. तसेच या नियमांचे उल्लंघन करणाऱ्याला शिक्षा करण्याचीही तरतूद याच धर्माने सांगितली. या धर्म ग्रंथानुसार धर्मांच्या प्रतिष्ठा व स्थापनेसाठी शिक्षा उपयुक्त आहे. शिक्षा या शब्दाचा अर्थ येथे दंड असा आहे. मत्स्य न्यायाच्या काळात शक्तीचा प्रयोग केला जात. परंतु शक्तीचा वापर धर्माच्या संरक्षणासाठी न होता स्वार्थ सिध्दी होत असत. त्यामुळे शिक्षेला शक्तीची पर्यायी मानता येणार नाही. शिक्षेला नैतिक व भौतिक स्वरुप आहे. राज्य या शिक्षेच्या पुर्तीचे माध्यम आहे. परंतु ते ही धर्माच्या तत्वात बंदिस्त.

बाहुबली-२ या चित्रपटात मोहरामतीदेवी जेंव्हा अमरिंदर बाहुबलीची पत्नी देवसेना हीच्या डोहाळे जेवणाच्या कार्यक्रमाला येते तेंव्हा त्यावेळेसचा सर्वांचा संवाद, देवसेना भल्लालदेवच्या सेनापतीचे बोटे कापते. तेंव्हा तीस बंदी बनवून राजदरबारात सादर करतात तेंव्हाचा माहेशमती देवी, अमरेंदर बाहुबली, भल्लाल देव, देवसेना आणि धर्मगुरु यांच्यातील संवाद शिक्षेचे स्वरुप, शिक्षेची अधिमान्यता, शिक्षेची अंमलबजावणी, गुन्हा आणि शिक्षेतील संबंध यावर प्रकाश टाकणारा आहे. जे एक प्राचीन भारतातील गुन्हा-राज्यसंस्था-धर्म आणि शिक्षा यांच्यातील संबंध व प्रक्रियेवर प्रभाव टाकते.

प्रस्तुत लेखाचा मुख्य उद्देश प्राचीन भारतातील धर्मग्रंथ आणि इतर प्रमाण साहित्य, विचारवंतांचे विचार व त्यांनी लिहिलेल्या ग्रंथाचा आधार घेवून शिक्षा पध्दतीला समजुन घेण्याचा आहे. या उद्देशपुर्तीच्या दिशेने जाताना वेदकाळ, मनुस्मृती, महाभारत, शुक्रनीति व कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथ व कालखंडाचा विचार करावा लागेल. कारण हे ग्रंथ हे विचारवंत त्याकाळातील प्रमाण, समाजमान्य व समाज आणि राज्यव्यवस्थेवर प्रभाव असणारे आहेत. या ग्रंथानीच त्याकाळातील व्यक्ति, कुटूंब, समाज, राज्य इत्यादींच्या संस्थांच्या आचरणाचे नियम बनवले. या ग्रंथानीच व्यक्तीला धर्म सांगितला. या ग्रंथानीच सृष्टी व व्यक्तिच्या निर्मितीचे कोडे समजुन सांगितले. या ग्रंथानीच व्यक्तीच्या वर्तनाला नियंत्रित व सुधारीत करण्याचे सामाजिक व राजकीय नियम सांगितले. या ग्रंथाला लोक सामाजिक संहिता, आजच्या भाषेत राज्यघटना मानत. लोक व्यवहार व राजकीय नियमनाचे आदर्श नियमालवली या ग्रंथानीच तयार केली. त्यामुळे आपणास यांच्या साह्यानेच प्राचीन भारतातील शिक्षेचे (दंड) स्वरुप व पध्दती समजून घ्यावी लागेल.

१)वेदकाळ व शिक्षा पध्दती :-

प्राचीन भारतीय इतिहासातील एक महत्वपूर्ण कालखंड म्हणजे वेदकाळ होय. या काळातील सर्व नियमांचे संस्थांचे संचलन वेदप्रणित होते. वेद वर्तमानात प्रमाण मानायचे किंवा नाही हा मुद्दा येथे महत्वाचा नाही. परंतु प्राचीन भारतीय शिक्षा पध्दती समजुन घेताना वेद व वेद काळाला दुर ठेवून जमणार नाही हे मात्र नक्की. वेदकाळातील शिक्षेचे स्वरुप अतिशय कठोर होते. प्रत्येक क्षेत्रात मग ते कौटुंबिक, सामाजिक किंवा राजकीय असते. वेदाने सर्वत्र कठोर शिक्षेची तरतूद केली. राजाप्रति विद्रोह करणाऱ्या प्रत्येक घटकाला मृत्युदंडाची शिक्षा होती मग त्या ठिकाणी पुरोहित का असेना ? वेदाने शिक्षेचे विविध प्रकार सांगितले. या शिक्षेतून सुटका मिळवण्याचा अग्नि परिक्षा हा एक उपाय ही सांगितला. या अग्नि परिक्षेतून जर हे सिध्द झाले की एखाद्याने गुन्हा केला तर त्यास तात्काळ मारले जात असत. वेदाने गुन्हेगाराचे नाव पण सांगितले. म्हणजेच गुन्हेगाराने ज्या प्रकारचा गुन्हा केला. त्यानुसारच गुन्हेगाराचे नाव ठेवत. उदा : राक्षस, अत्री, अधशंस, दुष्कृत, असत्यवादी इ. वेदांच्या अनेक सुक्तात दुष्कर्मी लोकांना शिक्षीत



Scanned by CamScanner

केल्याचे वर्णन आहे. परंतु दुसऱ्या बाजुने वेद शिक्षा देण्याच्या व्यवस्थेला आदर्श मानत नाहीत. अशा प्रकारच्या विविध शिक्षेमुळे गुन्ह्यावर नियंत्रण बसते परंतु गुन्हे नष्ट होत नाहीत. जोपर्यंत कोणत्याही समाजातून गुन्हा संपूर्णतः नष्ट होत नाही. तोपर्यंत त्या समाजास आदर्श समाज म्हणता येणार नाही. गुन्ह्यानुसार कठोरात कठोर शिक्षा सुनावण्या सोबतच समाजातून गुन्हे कायमचे नष्ट करण्याच्या उपायाचे वर्णनही वेदात आहे. वेदानुसार अज्ञानामुळे व्यक्ति वाईट वर्तन करतो. त्यामुळे व्यक्तितील अज्ञान दूर करावे. यासाठी अभ्यासाचा व त्यातून ज्ञान देणारा प्रत्येक विषय समाजातील सर्व घटकांपर्यंत घेवून जावा हा एक उपायही वेदांनी सुचवला. ज्यामुळे समाज आदर्श बनेल. आदर्श समाजात मनुष्य आदर्श व चांगला बने न की राक्षस. चांगल्या समाज व माणसाला राक्षसाची भिती राहत नाही. वेदामधील सोम नावाचे पात्र आहे. ज्याचे वर्णन एक न्यायाधीशाच्या रुपात केले. या सोमला उत्कृष्ट विज्ञानाची माहिती आहे. त्यामुळे त्याच्याकडे सत्य असत्याची, माहिती असणारे सर्वज्ञान आहे. जे त्याच्याकडे सहज येते. या ज्ञानातील जे सत्य, सरळ, प्रमाण आहे तो त्याचे संरक्षण करेल. जे असत्य आहे त्यास शिक्षित करेल. जी माणसे भांडखोर असतात त्यांच्या वाणीतील सत्यता व असत्यतेचा निर्णय सोम करतो. गुन्ह्याच्या स्वरुपानुसार कोणास मृत्युदंड द्यावा आणि कोणास तुरुंगवास हे सामच ठरवतो. एखाद्या गुन्हेगारास सोमने शिक्षा दिल्यानंतर तो सम्राट इंद्रापुढे जातो. सोमने जी शिक्षा दिली सम्राट इंद्र त्यास कार्यान्वित करतात.

अशाप्रकारे वेदांनी शिक्षेसंबंधी टिप्पणी केली. परंतु वेदाच्या सामाजिक-राजकीय स्वरुपाच्या शिक्षेवर भारतातील अनेक अभ्यासक, विद्वान व विचारवंतांनी शंका घेवून त्यास अमान्य केले. वेद हे जरी चांगले आहेत. असे आपण समजले तरी त्याचे संपूर्ण ज्ञान आमच्याकडेच आहे असे म्हणणाऱ्या समाजातील काही ठेकेदारांनी त्याचा अर्थ आपल्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी सांगितला. वेदाच्या सुक्ताचे, सुक्तातील नियमांचे सामाजिकरण करताना त्यास चतुर्वर्णव्यवस्थेचा संदर्भ जोडला. त्यामुळे वेदांनी सांगितलेली शिक्षेचे स्वरुप त्या काळात जरी प्रमाण वाटत असले तरी त्याची सामाजिक बाजु वर्तमान लोकशाहीच्या युगात कलुषित असल्याचे वाटते.

२) मनुस्मृति आणि शिक्षा पध्दती :-

प्राचीन भारतातील अनेक ग्रंथापैकी मनुस्मृती हा एक प्रमुख ग्रंथ आहे. प्राचीन भारताच्या धर्म इतिहासात मनुस्मृतीला अधिक महत्व आहे. मनुस्मृति सामाजिक, राजकीय व धार्मिक आचारसंहिता एक व्यापक सार आहे. तो व्यक्ती वर्तनाचे मापदंड ठरवणारा त्याकाळातील एक आदर्श ग्रंथ आहे. त्यामुळें आपणास मनुस्मृतीने शिक्षेच्या स्वरुपाबाबत केलेले विवेचन पहावे लागेल व ते वर्तमानानुसार तपासावे ही लागेल.

मनुस्मृतीतील शिक्षा व्यवस्था वेदकालीन शिक्षा व्यवस्थेवरच आधारित आहे. मनुस्मृतीनुसार ज्याची शिक्षा श्रेष्ठ व भयंकर आहे. त्यास संपूर्ण जग घाबरते. राजा संपूर्ण जगाला आपल्या शिक्षेमुळेच आपल्या अधीन करु शकतो. राजानेही आपल्या विरोधकास साम, दाम, दंड, भेद या उपायांचा वापर करुनच नियंत्रणात आणावे लागेल. ज्याप्रमाणे बाहुबली-२ मध्ये भल्लालदेव, त्याचे वडील व्यूहरचना रचुन अमरिंदर बाहुबलीला कटप्पाच्या हाताने संपवतात. संपूर्ण सामाजिक व्यवस्थेच्या सुरक्षित व योग्य संचलनासाठी शिक्षा आवश्यक आहे. शिक्षेच्या अभावात धर्माचे पालन व आचरण होत नाही. पृथ्वी, स्वर्ग व नरकातही मनुष्य धर्माचे पालन शिक्षेमुळेच करतो. मनुस्मृती या ग्रंथाने लोक आपापसात संघर्ष कोणकोणत्या कारणांमुळे करतील हे अतिशय स्पष्टपणे सांगितले. ज्यात उधारीचा व्यवहार करणे, एखाद्याची संपत्ती किंवा मालकीची वडिलोपार्जि किंवा स्वअर्जित वस्तु / संपत्ती हिसकावून घेणे, एखादे वचन देवून किंवा करार करुन व्यापारात एखाद्याचे नुकसान करणे, दान देण्याची घोषणा करुन दान देण्यास विरोध करणे, जुगार खेळणे, चोरी करणे, व्याभिचार करणे, कामगारांचे वेतन कमी करणे, मारामारी बाबतचे वाद ईत्यादी विषयाबाबत राजाने नित्यधर्माचा आधार घेवून कार्य करण्याचा निर्णय घ्यावा. राजव्यवस्थेशी संबंधित कामे करण्यास राजा जेंव्हा अकार्यक्षम असेल किंवा त्याचे शारिरीक स्वास्थ्य ठिक नसेल तेंव्हा राजाचे कार्य करण्यासाठी राजाने एका योग्य ब्राम्हणाची नियुक्ती करावी.

मनुस्मृती न्याय व्यवस्था व शिक्षा व्यवस्थेचे एकत्रित विवेचन करते. राजाने सत्य-असत्याची तपासणी करताना वाद-प्रतिवादींच्या मानसशास्त्रीय अध्ययन करणे क्रमप्राप्त आहे. कारण त्यामुळेच त्याला सत्य निर्णय घेता येईल. घ्मनुस्मृतीने न्याय प्रणालीला प्रभावित करण्यासाठी ज्या पध्दतीने साक्ष तपासणी करण्याची पध्दत वर्णिली ती स्तुत्य व वाखाणण्याजोगी आहेड. मनुस्मृतीने राजाच्या उत्पत्तीचा दैवी सिध्दांत प्रमाण मानला. त्याची सर्वोच्चता सांगितली. धर्माला पुर्नस्थापित, दिव्यप्रकाशित व तेजोमय करण्याचे कार्य राजाचे आहे. परंतु हे सर्व करताना राजाने धर्माचे उल्लंघन कधीच करु नये. राजाला आपले सर्व कार्य करण्यासाठी ब्रम्हानेच शिक्षेचा आधार दिला. ज्याचा वापर करुन राजा आपले कार्य करु शकतो व सर्व प्राणिमात्रांचे संरक्षण करतो. मनुस्मृतीने राजापेक्षा शिक्षेला प्रधान मानले. तसेच शिक्षेचे स्वरुप धर्मप्रधान असावे. राजा आपले कार्य शिक्षेच्या माध्यमातून करु शकतो. शिक्षा म्हणजेच राजा होय. शिक्षा हेच चारही आश्रमांचा धर्म आहे. शिक्षाच संपूर्ण समाजावर राज्य करते. शिक्षाच संपूर्ण समाजाचे संरक्षण करते. राजाने गुन्ह्याच्या स्वरुपानुसार व गुन्हेगाराच्या गुन्ह्याच्या



Scanned by CamScanner

DEGLOOR COLLEGE ... SOCIETY'S DEGLOOR Dist.Nanded



सामर्थ्यानुसार शिक्षा सुनवावी. राजामार्फत शिक्षेचा योग्य पध्दतीने वापर व्हावा. राजामार्फत शिक्षेचा अयोग्य मार्गाने किंवा स्वतःच्या मनाला वाटेल त्या पध्दतीने वापर करणे त्यास अपयशी बनवणारे आहे. तसेच त्यास नरकात पाठवणारे आहे.

मनुस्मृतीत शिक्षेसंबंधी सविस्तर वर्णन करण्यात आले. मनुस्मृतीत शिक्षेसंबंधीच्या प्रकाराची विभागणी चार प्रकारात केली ती पुढीलप्रमाणे.

१) गुन्हेगाराला धर्मसभेत आणुन त्याने केलेल्या गुन्ह्याबाबत समजावणे आणि भविष्यातमाझ्याकडून अशाप्रकारचा कोणताही गुन्हा होणार नाही असे वचन घेणे.

२) धर्मसभेत गुन्हेगाराने केलेल्या गुन्ह्याबाबत त्यास फटकारणे, अपमानित करणे आणि त्याने भविष्यात जर असा गुन्हा पुन्हा केला तर कठोर शिक्षा देण्यात येईल अशी चेतावणी देणे.

३) गुन्हेगाराने केलेल्या गुन्ह्याबाबत त्यास आर्थिक दंड सुनावणे.

४) गुन्हेगारास शारिरीक त्रास देणे, मृत्युदंडाची शिक्षा सुनावणे त्याचा एखादा अवयव निकामी करणे इ.

मनुस्मृति पशु-पक्षी व प्राण्याच्या हत्येला हा गुन्हा मानुन त्यास शिक्षा देण्याची तरतुद केली. राजा हाच शिक्षेचा मालक असतो. त्यामुळे शिक्षा स्वरुप व ती देण्याची व न देण्याची प्रक्रिया पुर्णतः त्याच्याच स्वाधीन असते. मनुस्मृतिने राजासाठीही शिक्षेची तरतुद केली. एक सामान्य नागरिक आणि राजा या दोघांनी जर सारखाच गुन्हा केला तर दोघांच्या शिक्षेत हजार पटीच्या रक्कमेचा फरक आहे या शिक्षेतून मिळणारे धन राजाने पाण्यात टाकावे किंवा ब्राम्हणांना द्यावे, व्यक्तिला आत्मरक्षणाचा अधिकार मनुस्मृति देते. जर एखाद्या व्यक्तिला जिवानिशी संपवण्याचा कोणी प्रयत्न करत असेल तर अशावेळी त्या व्यक्तिने त्यापासून स्वतःचे संरक्षण करावे. संरक्षण करणे शक्य नसल्यास आक्रमण करणाऱ्याला संपवावे. अशावेळी आक्रमणापासून स्वतःचा बचाव करणारी व्यक्ति देवी नसते. त्याचे ते कार्य अधर्म नाही. ते प्रायश्चित्तास पात्रही नाही.

वरील प्रमाणे मनुस्मृतिच्या विविध भागात शिक्षेचे विविध प्रकार व स्वरुप सांगितले. त्यातील प्राणी मात्राचे संरक्षण करणे, व्यक्तिला आत्मसंरक्षणाचा अधिकार देणे ईत्यादी. बाबी लोकशाहीतील न्यायदानाच्या तरतूदीशी समान वाटतात. मनुस्मृति हा एक प्रमुख ग्रंथ आहे. ज्यास प्रमाण मानुन प्राचीन काळात राजा शिक्षा सुनावत व राज्यकारभार करत असत. परंतु याच मनुस्मृतिचे दहन २० व्या शतकात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केले. १२ व्या शतकात मनुस्मृतितील सर्व तत्वांना विरोध करुन मानव जात समान मानणाऱ्या वचन साहित्याची निर्मिती अनुभवमंटपात महात्मा बसवेश्वरांनी केली. फुले-शाहु यासह अनेक समाज सुधारकांनी मनुस्मृतिला विरोध केला. मनुस्मृतितील शिक्षा व्यवस्था ब्राह्मणी हितसंबंधाचे संरक्षण करणारी वाटते. या शिक्षा व्यवस्थेला गुन्ह्याच्या स्वरुपानुसार जरी प्रारुप दिले असले तरी त्याच्या अंमलबजावणीचे व त्याबाबतच्या सल्ल्याचे सुत्र ब्राह्मणी व्यवस्थेच्या हातात जाणवते. मनुस्मृति हा ग्रंथ उच्चवर्णीय, पुरोहित वर्ग व राजा आणि सरंजामदारांनी मान्य केला होता. त्यास अभिजनाच्या मान्यतेचा व अभिजनाच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याचा आधार होता. त्यामुळे वर्तमान न्याय व्यवस्था, पोलिस यंत्रणा आणि मनुस्मृतिच्या शिक्षा व्यवस्थेत फार तफावत आहे. प्राचीन काळात शिक्षेचे स्वरुप मनुस्मृति ठरवते. वर्तमानात भारतीय राज्यघटना शिक्षेचे स्वरुप ठरवते. मनुस्मृतितील शिक्षेला धर्म, राजेशाहीचा व दैवी सिध्दातांचा आधार आहे. तर संविधानातील शिक्षेला विज्ञान, विवेक, न्याय, समता व मानवतेचा आधार आहे.

### ३) शुक्रनीति आणि शिक्षा व्यवस्था :-

शुक्रनीति हा एक प्राचीन भारतातील महत्वाचा ग्रंथ, विचार व मत आहे. ज्याने राजाला शिक्षेचा मुख्य वाहक मानले. राजाच सर्व धर्माचा एकमात्र रक्षक आहे. जो राजा शिक्षेच्या नियमांचे पालन करुन गुन्हेगारास त्याच्या गुन्ह्याच्या प्रमाणात शिक्षा देत नाही. त्याचा विनाश आवश्य आहे. धिक्काराने, बंदी बनवणे, विनाश करणे, त्याच्याकडील सर्व संपत्ती हिसकावून घेणे, गाढवावर बसवुन धिंड काढणे, त्याला अपंग बनवणे, त्याचा खुन करणे ईत्यादी शिक्षेचे अनेक प्रकार शुक्रनीति सांगते. व्यक्तिला दुराचारी मार्गावरुन सदाचारी मार्गाच्या दिशेने घेवून जाणारे शिक्षा हे साधन आहे. शिक्षेच्या भितीने प्रजा आपल्या धर्माशी एकनिष्ठ असते. परिणामतः कोणताही वाईट विचार कृत्य, अनैतिक किंवा समाज विरोधी काम करत नाही. शासकाने शिक्षेचा वापर करण्यात असमर्थता, शिथिलता किंवा दिरंगाई करु नये. अन्यथा त्याचे परिणाम त्यास भोगावे लागतील.

शिक्षेची सुनावणी पारदर्शकपणे व्हावी, समजा शिक्षक किंवा धर्मगुरुंनीही गुन्हा केला तर त्यांना शिक्षा द्यावी. शिक्षेचे प्रमाण आणि स्वरुप गुन्ह्याच्या प्रमाण व स्वरुपावर आधारित आहे. शिक्षा पुर्वग्रहदुषित, मानसिक विकृती व वैयक्तिक इच्छेवर आधारित नसावी. एखाद्यास शिक्षा देताना तर्क, तथ्यता, सत्यता, साक्ष कायद्यातील तरतुदींचा आधार प्रमाण मानावा. एखाद्या व्यक्ति विरुध्द गुन्हा सिध्द झाल्यानंतरच शिक्षेची अंमलबजावणी व प्रारंभ करावा. गुन्हेगारास स्वतःला निर्दोष असल्याचे सिध्द करण्याची संपूर्ण संधी असावी. याशिवाय संपुर्ण साक्ष पुराव्यांची तपासणी झाल्यानंतर त्याच्यावरील दोष जाहिर करावे.

लोकांनी गुन्हा करण्याचे धाडस करु नये, शिक्षेतून त्याने



Scanned by CamScanner

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Education Society, Dist. Nanded



केलेल्या गुन्ह्याचा प्रतिशोध घेणे, त्याच्या वर्तनात सुधारणा करण्याची त्यास संधी द्यावी. अशा हेतूनेच गुन्हेगाराला शिक्षा द्यावी. शुक्रनीति सामाजिक, आर्थिक, नैतिक, राजकीय, न्यायीक, प्रशासकीय सर्व प्रकाराच्या गुन्ह्याची दखल घेतली. तसेच त्या गुन्ह्यांना विरोधाची तरतूद केली. या ग्रंथाने राजद्रोहाच्या गुन्ह्यातच मृत्युदंड देण्याची तरतूद केली.

वरीलप्रमाणे शुक्रनीति शिक्षेच्या स्वरुप व प्रकारा बाबतचे विवेचन करते. शुक्रनीतिचे विवेचन त्या काळात योग्य असेल. परंतु वर्तमानात गुन्हे व त्यांच्या स्वरुपात विलक्षण बदल होत आहे. या बदलाचा विचार शुक्रनीति वर्तमानात गुन्हे आणि शिक्षा याबाबत योग्य वाटत नाही. परंतु त्यातील काही बाबी विशेषतः गुन्हेगाराला गुन्हेगार म्हणून सिध्द किंवा घोषित करण्यापूर्वी आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे व शिक्षेत पारदर्शकता असावी हे विचार योग्य आहेत. याच विचाराचा परिणाम वर्तमानातील न्याय यंत्रणा व तिच्या शिक्षा सुनावणे व खटला चालवण्याच्या प्रक्रियेवर झाल्याचे जाणवते.

### ४) कौटिल्यप्रणीत शिक्षा व्यवस्था :-

प्राचीन भारतीय राज्यशास्त्र व अर्थशास्त्राचा जनक म्हणून कौटिल्याचाच उल्लेख केला जातो. तो त्या काळातील एक सर्वश्रेष्ठ विचारवंत आहे. ज्याने कुटनीति, शासन, प्रशासन, अर्थशास्त्र, परराष्ट्र धोरणाचे योग्य पध्दतीने प्रतिपादन केले. त्याने आपले सर्व विचार अर्थशास्त्र या ग्रंथात मांडले. कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ अनेक अर्थाने आपणास वर्तमानात उपयुक्त व मार्गदर्शक आहे. परंतु या ठिकाणी कौटिल्याच्या विचारातून प्रकट होणारे शिक्षेचे स्वरुप, प्रकार व त्यासी संबंधित विचारांचा विचार करावयाचा आहे. कौटिल्याचे शिक्षेबाबतचे सर्व विचार करावयाचा आहे. कौटिल्याचे शिक्षेबाबतचे सर्व विचार अर्थशास्त्र या ग्रंथात आहेत.

कौटिल्य अर्थशास्त्र ग्रंथात सांगतो की, राज्याच्या उदयासोबतच शिक्षेची उत्पत्ति झाली. राज्याचा उदय होण्यापूर्वी पासूनच धर्माचे प्रभुत्व आहे. राजाची भूमिका धर्मानुकला प्रजेकडून व्यवहार करुन घेण्याची असावी. शासन चालवण्याची धोरण म्हणजेच शिक्षा होय. शिक्षा धोरण एक महत्वाची विधी आहे. शिक्षेचा संबंध वस्तुचे प्राषण, रक्षण, वृध्दी व वितरणाशी इ. सर्व साधनाशी आहे. शिक्षा ही संपूर्ण सामाजिक राजकीय संबंधाशी संबंधित आहे. शिक्षेत राजा, मंत्री, सैन्य यासर्वांचा समावेश असतो. शिक्षेच्या माध्यमातून राज्यामार्फत सुरक्षित असणारे चार वर्ण आणि आश्रम स्वतःत धर्म व कर्माशी संलग्न असतात. कौटिल्याच्या मते अग्निशक्ती, त्रयी, वार्ता व शिक्षा या चार विद्या आहेत. शिक्षेस सुशासन व कुशासनाचे ज्ञान असते. शिक्षा वरील चार घटकावर अवलंबून असते. शिक्षेमुळेच सर्व बाबी व वस्तु सुरक्षित असतात. त्यांच्यात वाढ होते. शिक्षेवरच संपूर्ण जगताचा प्रवास अवलंबून आहे. त्यामुळे लोकांना लोककल्याणाच्या दिशेने घेवून जाणारा राजा सदैव त्यांना शिक्षा करण्यासाठी तयार असतो. धर्मासोबतच लोकांचे संरक्षण करणे राजाचे कर्तव्य आहे. यामुळेच राजाला स्वर्ग प्राप्ती होते. जो राजा प्रजेचे संरक्षण न करता प्रजेस विनाकारण त्रास देतो त्या राजालाही शिक्षा द्यावी. शिक्षाच या लौकिक व पारलौकिक जीवनाचे संरक्षण करते.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रात राजा हाच सर्वश्रेष्ठ न्यायदान देणारा अधिकार आहे. तर राज्य हा त्याचा मुख्य आधार आहे. राजाच्या न्यायिक शक्तीला कौटिल्याने कायद्याच्या अधिन मानले. दिवानी व फौजदारी स्वरुपाच्या गुन्हे व न्यायालयाचा उल्लेख कौटिल्याच्या अर्थशास्त्रात आढळतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात वर्णन केलेली न्यायव्यवस्था वर्तमान न्याय व्यवस्थे सारखी आहे. न्यायाधिशाच्या पदावर व्यक्तिची निवड करताना राजाने त्यांची क्षमता व गुणवत्ता तपासावी. जे व्यक्ति पारदर्शक, ईमानदार, प्रमाणित, कायदा व न्यायात पारंगत आहेत. अशानाच न्यायाधिश बनवावे. न्यायालयाने दिलेल्या निर्णया विरुध्द अपील फक्त राजाकडेच करता येते. ज्याबाबत राजाचा शब्द अंतिम असतो. राजाने न्यायदानाचे काम करताना योग्य व्यक्तिंचा सल्ला घ्यावा. अर्थशास्त्रात स्थानिक व विभागीय न्यायालयांचा उल्लेख आहे. न्यायदानाच्या कार्यात कसुर करणाऱ्या किंवा पक्षपाती वर्तन करणाऱ्या न्यायाधिश व इतरांस शिक्षा करावी.

कौटिल्या अर्थशास्त्र ग्रंथात गुन्ह्याची व्याख्या केली त्यांच्या मते गुन्हा म्हणजे असे कृत्य ज्यामुळे राज्याचा कायदा आणि सामाजिक नियमांचे उल्लंघन होते. किंवा जाणुन बुजून एखाद्याचे नुकसान होणे. कौटिल्याच्या मते शिक्षा अधिक कठोर व अधिक कमी असू नये. शिक्षेचे प्रमाण आणि स्वरुप गुन्ह्याचे गांभीर्य आणि परिस्थितीवर आधारित असावे. ज्या गुन्हेगाराचे दोष सिध्द झालेत त्यालाच दंडित करावे. शिक्षेबाबत समतेचा दृष्टीकोन स्विकारावा, कारण राज्यात कायद्यासमोर सर्व समान आहेत. गुन्ह्याची सिध्दता आणि शिक्षेचे निर्धारण एका निर्धारित प्रक्रियेनुसारच व्हावे. या प्रक्रियेत समाविष्ट सर्वांचे अधिकार, संधी व मर्यादा प्रतिकारात्मक, निवारक आणि सुधारक असा तीन प्रकारात केले. तसेच त्याने गुन्ह्यांचे वर्गीकरण पाच भागात केले. ज्यात सामाजिक गुन्हे, आर्थिक गुन्हे, कर्मचाऱ्यांचे गुन्हे, राजद्रोह आणि शरीर किंवा संपत्तीला नुकसान पोहचवणारे गुन्हे इत्यादी.

अशा प्रकारे प्राचीन भारतात वेद, मनुस्मृति, शुक्रनीति आणि कौटिल्याने शिक्षेबाबत चिंतन केले. याशिवाय महाभारत, रामायण, उपनिषद, स्मृति, पुराणके, ब्राह्मण्यके इत्यादीतही शिक्षेच्या स्वरुप, प्रकार, प्रमाण, स्थितीचे विश्लेषण करण्यात आले. याशिवाय प्राचीन भारतात चार्वाक, महात्मा गौतम बुध्द, वर्धमान महावीर यांनीही या



Scanned by CamScanner

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Sr.No.62759
Vidyawarta®
Jan. To March 2018
Issue-23, Vol-04
0116

शिक्षेची चिकित्सा त्याच काळात केली. प्राचीन भारतातील शिक्षेचे स्वरुप स्पष्ट करणाऱ्या या ग्रंथांची चिकित्सा मध्ययुगात महात्मा बसवेश्वर, संत कबीर, वारकरी संप्रदाय, छत्रपती शिवाजी महाराज आधुनिक युगात राजा राममोहन रॉय पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत अनेक विचारवंत, समाजसुधारकांनी केली.

प्राचीन भारतातील शिक्षेच्या या आधारापैकी कौटिल्याने अर्थशास्त्रात शिक्षेचे केलेले वर्णन वर्तमानात अधिक उपयुक्त, प्रासंगिक व दुरदृष्टीचे वाटते. तसेच हे विचार त्या काळातील भारतीय समाजमनाचे शिक्षा, राज्य, राजा इत्यादींबाबतचे चिंतन स्पष्ट करणारे आहेत. वर्तमानात शिक्षेच्या सुधारणावादी दृष्टीकोनावर अधिक भर दिला जातो. जो विशेषतः कल्याणकारी राज्याचा आधार व गांधीवादी सिध्दांतांची देय असेल. परंतु प्राचीन भारताच्या शिक्षेला राजेशाहीची झालर अधिक आहे. प्राचीन शिक्षा व्यवस्था अधिक कठोर वाटते. कारण तो काळ राजेशाहीचा, सरंजामशाहीचा, मक्तेदारीचा व अधिकार व सत्तेच्या केंद्रीकरणचा आहे. परंतु वर्तमान शिक्षेचे स्वरुप सुधारणावादी, लोकशाही व मानवी मुल्यांचे आहे. वेदकाळातील शिक्षा व्यवस्थेपेक्षा कौटिल्याची शिक्षा व्यवस्था अधिक प्रगल्भ वाटते. परंतू वेद, शुक्रनीति, मनुस्मृति आणि कौटिल्याच्या शिक्षा विषयक विचारावर धर्माचा प्रभाव समप्रमाणात जाणवतो.

संदर्भ :

१) प्राचीन भारत में दूत पध्दती-आनन्द प्रकाश गौड-लोकभारती प्रकाशन-इलाहाबाद-१९८९.

२) प्राचीन भारतीय ऐतिहासिक शासक-एस.एल.नागोरी-कान्ता नागोरी-राज पब्लिशिंग हाऊस-जयपूर-२००५.

३) हिंदू सभ्यता-राधाकुमुद मुखर्जी-राजकमल प्रकाशन-पटणा-१९९०.

४) चंद्रगुप्त मौर्य और उसका काल-राधाकुसुम मुखर्जी-राजकमल प्रकाशन-पटणा-१९९०.

५) प्राचीन भारत में संघटित जीवन-मूळ लेखक : डॉ.रमेशचंद्र मजुमदार-अनुवादक, प्रो.कृष्णदत्त वाजपेयी-सागर विश्वविद्यालय, १९६६.

६) प्रशासनिक चिन्तक-डॉ.सुरेन्द्र कटारिया-नेशनल पब्लिशिंग हाऊस, जयपूर-२००५.

7) History and Administration of Justice-Giriraj Shah, Anmol Publications Pvt.Ltd.New Delhi-2000.

८) प्राचीन भारतीय चिन्तन में प्रशासनिक नियंत्रण का स्वरुप-डॉ.राकेश कुमार झा-डॉ.महेन्द्र सिंह शर्मा-रितु पब्लिकेशन्स-जयपूर-२००६.

27

# महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी व ग्रामीण विकास.

प्रा. किरण बाळासाहेब भोईटे,
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
वाठार स्टे. ता. कोरेगांव जि. सातारा.

***********

**महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी :-**

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी संपूर्ण जगात नावलौकीक पावलेली आहे. ग्रामीण भागातील कायापालट करणाऱ्या या उद्योगाने सहकाराच्या माध्यमातून सर्व सामान्य मानसाची पत निर्माण केली आहे. जरी या सहकारी साखर कारखानदारीच्या गुण—दोषांची चर्चा करण्याचा प्रयत्न केला जात असला तरी, सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून विचार केला तर या उद्योगाचे महत्त्व कमी होत नाही हे मान्य करावे लागेल, याचे मुळ कारण म्हणजे या उद्योगामुळे ग्रामीण विकासाला जी चालना मिळालेली आहे ती अत्यंत महत्त्वाची आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर औद्योगिक विकासाला चालना मिळाली हे जरी खरे असले तरी ही चालना शहरी भागापुरती मर्यादित होती. अशा परिस्थितीमध्ये ग्रामीण भागात आर्थिक विकासाला पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न हा सहकारी साखर कारखादारीने केला आहे. हे मान्य करावे लागेल. भारतामध्ये उत्तरप्रदेशानंतर महाराष्ट्रामध्ये सहकारी साखर कारखाने जास्त आहेत. या कारखानादारीमुळे साखर उत्पादन, अल्कोहोल, वीजनिर्मिती, बायोगॅस, मद्यनिर्मिती कंपोस्ट खत कागद अशा विविध उत्पादनाच्या माध्यमातून आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. त्याचबरोबर ऊसतोड मजुरांबरोबर साखर कारखानदारी मध्ये काम करणारे कर्मचारी व अप्रत्यक्षरीत्या रोजगारी मध्ये प्रचंड प्रमाणात वाढ घडून आलेली आहे व



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

Scanned by CamScanner